29 JAN 2018
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सुदृढ लोकशाहीसाठी कार्यरत राहूया

## प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

७२ वर्षांची लोकशाहीची वाटचाल लक्षणीय आहे. या पुढेही सुदृढ लोकशाहीसाठी कार्यरत राहू या, असा संदेश शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने दिला.

शिवाजी विद्यापीठात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय लोकशाही सप्ताहाच्या अनुषंगाने त्यांनी संदेश दिला. संदेशात ते म्हणाले, भारतीय प्रजासत्ताकाच्या वाटचालीत आपल्या लोकशाहीची लक्षणीय वाटचाल झाली आहे. यापुढील काळातही सुदृढ व प्रगल्भ लोकशाहीसाठी आपण कार्यरत राहणे आवश्यक आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

राधानगरी, गगनबावडा, शाहूवाडी, आजरा, चंदगड, भुदरगड या तालुक्यातल्या दुर्गम भागातील धनगरवाड्यांतील सुमारे १५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती हे विद्यापीठातील प्रजासत्ताक दिन समारंभाचे एक मुख्य वैशिष्ट्य ठरले. उदय गायकवाड, प्रमोद पाटील यांच्यासह हिल रायडर्स एन्ड हायकर्स ग्रुपच्या सदस्यांच्या समवेत या विद्यार्थ्यांनी ध्वजवंदन केले. प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह सर्व अधिकाऱ्यांनी त्यांची आस्थेने चौकशी केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
तरुण भारत

**शिवाजी विद्यापीठ**

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, एनएसएस विभाग प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, क्रिडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. भारती पाटील, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
सकाळ

# रणधीर शिंदे यांना अनंत काणेकर पारितोषिक



रणधीर शिंदे

कोल्हापूर, ता. २८ : महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे झालेल्या दिवाळी अंक स्पर्धेत मौज, ललित, समदा, साहित्य शिवार, अक्षरनामा या दिवाळी अंकांना विविध पुरस्कार जाहीर झाले. उत्कृष्ट ललित लेखासाठीचे 'अनंत काणेकर पारितोषिक' शब्दशिवार या दिवाळी अंकातील प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांच्या 'येडापिसा वारा चिकटलेला जन्मभर तुझ्या देहाला' या लेखाला जाहीर झाले आहे. डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. महाराष्ट्रातून १८८ दिवाळी अंक आले होते. त्यांतून वरील दिवाळी अंकाची पारितोषिकांसाठी निवड झाली. परीक्षक म्हणून डॉ. अविनाश सांगोलेकर, विनया देसाई, प्रभा सोनवणे, प्रतीक पुरी यांनी काम पाहिले. पारितोषिक वितरण गुरुवारी (ता. १) सायंकाळी साडेसहा वाजता पुण्यातील साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणार आहे. सुप्रसिद्ध चित्रकार रवी परांजपे आणि पुण्याच्या महापौर मुक्ता टिळक यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठ परिसरात मतदार जनजागृती रॅली

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयाच्या अनुषंगाने व लोकशाही पंधरवड्याची सुरुवात याचे औचित्य साधून मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य इमारतीपासून रॅलीस प्रारंभ झाला. पुढे एन.सी.सी. भवन, प्रतिभानगर, माऊली चौक, सायबर चौक ते परत शिवाजी विद्यापीठ असे रॅलीचे मार्गक्रमण झाले. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, नोडल ऑफिसर डॉ. प्रल्हाद माने, डॉ. रवींद्र भणगे, डॉ. सुभाष कोंबडे, डॉ. भगवानराव माने यांच्यासह विविध अधिविभागांतील विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
तरुण भारत

# शहरातील पंधरा केंद्रावर 'सेट' परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने घेण्यात येणारी (युजीसी) सेट परीक्षा शहरातील १५ केंद्रावर सुरळीत पार पडली. या परीक्षेला ७ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला होता. त्यापैकी ६ हजार १३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर १ हजार २७७ विद्यार्थी गैरहजर होते, अशी माहिती शिवाजी विद्यापीठातील सेट परीक्षा विभागाचे समन्वयक डॉ. पी. व्ही. अनुभुले यांनी दिली.

सेट परीक्षा शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत, तंत्रज्ञान अधिविभाग, रसायशास्त्र अधिविभाग, विवेकानंद महाविद्यालय, सायबर कॉलेज, न्यू कॉलेज, महावीर महाविद्यालय, एस. एम. लोहिया ज्युनिअर कॉलेज, शांतीनिकेतन, न्यू मॉडेल इंग्लिश स्कुल, पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कॉलेज, न्यू हायस्कूल, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज या पंधरा केंद्रावर झाली. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत तीन पेपर झाले. या परीक्षेसाठी १५ केंद्रावर जवळपास २०० कर्मचारी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होते.

- **७ हजार ४१३ पैकी ६ हजार १३६ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा**
- **१ हजार २७७ विद्यार्थी गैरहजर**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
लोकमत

# सुमारे सहा हजार जणांनी दिली ‘सेट’

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) रविवारी कोल्हापूर जिल्ह्यातील विविध आठ केंद्रांवर घेतली. सहा हजार १२६ परीक्षार्थ्यांनी परीक्षा दिली. केंद्रांवर पालकांनी मोठी गर्दी केली होती. एक हजार २७७ परीक्षार्थी गैरहजर राहिले.

कोल्हापूर केंद्रावरून सात हजार ४१६ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. एकूण आठ केंद्रांवर परीक्षा झाली. त्यामध्ये सायबर, विवेकानंद महाविद्यालय, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, महावीर महाविद्यालय, एस. एम. लोहिया ज्युनिअर कॉलेज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज कॉलेज, आदींचा समावेश होता.

सकाळी दहा ते सव्वा अकरा या वेळेत पहिला पेपर झाला. सकाळी सव्वाअकरा ते दुपारी एक या वेळेत दुसरा, तर दुपारी अडीच ते सायंकाळी पाच या वेळेत तिसरा पेपर झाला. ‘सेट’ परीक्षेच्या कोल्हापूर विभागाचे समन्वयक पी. व्ही. अनभुले यांनी काम पाहिले. सर्व केंद्रांवर परीक्षा सुरळीत पार पडली.

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी होते. परीक्षेसाठी सकाळी आठ वाजल्यापासून परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांची गर्दी होऊ लागली होती.

## परीक्षार्थी नोंदणी

- एकूण नोंदणी : सात हजार ४१३
- उपस्थिती परीक्षार्थी : सहा हजार १३६
- गैरहजर परीक्षार्थी : एक हजार २७७

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
सकाळ

# कोल्हापुरातील १५ केंद्रांवर सेट परीक्षा

कोल्हापूर, ता. २८ : येथील पंधरा केंद्रांवर ६ हजार १३६ विद्यार्थ्यांनी आज राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) दिली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने ३५ विषयांसाठी ही परीक्षा झाली. ७ हजार ४१३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी १ हजार २७७ विद्यार्थी अनुपस्थित राहिले. सकाळी १०:००, ११:४५ व २:३० वाजता अशा तीन वेळात पेपरला सुरवात झाली. शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र, तंत्रज्ञान, रसायनशास्त्र अधिविभागासह सायबर, न्यू, विवेकानंद, महावीर, शहाजी छत्रपती, शांतिनिकेतन, शाहू महाराज हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, न्यू हायस्कूल, एस. एम. लोहिया व कॉमर्स कॉलेजमध्ये बैठक व्यवस्था केली होती.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# शहरातील १५ केंद्रांवर सेट परीक्षा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

रविवारी घेण्यात आलेली सेट परीक्षा सुरळीत पार पडली. सात हजार १६ विद्यार्थ्यांनी कोल्हापुरातील पंधरा केंद्रांवर ही परीक्षा दिली. रविवारी कोल्हापुरात असलेल्या लिंगायत समाजाच्या मोर्चामुळे जिल्ह्यातून कोल्हापुराती केंद्रावर परीक्षेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांचा काहीसा गोंधळ झाला. मात्र सर्व केंद्रावर विद्यार्थी वेळेत पोहोचल्यामुळे तीनही पेपर सुरळीत पार पडले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 JAN 2018
पुढारी

# राज्यस्तरीय पात्रता परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन व गोवा शासन प्राधिकृत यु.जी.सी. (नवी दिल्ली) मान्यता प्राप्ततेने सहाय्यक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) कोल्हापुरात रविवारी सुरळीत पार पडली. ही माहिती शिवाजी विद्यापीठ सेट परीक्षा केंद्राचे समन्वयक डॉ. पी. व्ही. अनभुले यांनी दिली.

३५ विषयासाठी ही परीक्षा झाली. यासाठी ७ हजार ४१३ परीक्षार्थींनी नोंदणी केली होती. यापैकी ६ हजार १३६ परीक्षार्थी उपस्थित होते. सकाळी १० वाजता पहिला पेपर झाला. सर्व विषयांसाठी हा सामायिक पेपर होता. त्यानंतर ११.४५ वाजता दुसरा व दुपारी २.३० वाजता तिसऱ्या पेपरला प्रारंभ झाला. लिंगायत समाजाच्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर परीक्षार्थींना केंद्रावर लवकर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते.